ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 12-11-2024

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये नरखेड ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-11-12 (पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

हवामान घटक	2024-11-13	2024-11-14	2024-11-15	2024-11-16	2024-11-17
पर्जन्यमान (मिमी)	0.1	0.1	0.1	0.1	0.1
कमाल तापमान (अं.से)	29.9	30.2	30.2	30.6	30.5
किमान तापमान (अं.से)	18	18	17.7	17.7	17.7
सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के)	63.2	58.9	58	55	52.2
दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के)	29.5	27.5	25.1	24.1	22.5
वाऱ्याचा वेग(किमी/तास)	7.9	8.1	7.4	6.6	5.8
वाऱ्याची दिशा(अंश)	39.4	32.2	29	22.3	29.7
मेघाच्छादन (ऑक्टा)	0	0	2	4	2

हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १३ ते १७ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • पुढील ५ दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

कृषि सल्ला:

सामान्य सल्ला: • पुढील ५ दिवस कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, सोयाबीन मळणी ची कामे, रब्बी हंगामातील पेरणीचे कामे, आंतरमशागतीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच कृषी रसायनांच्या फवारणीची कामे पुढील ५ दिवस सुरु ठेवावी. • हरभरा पिकामध्ये मर व मुळकुज ह्या बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी बियाण्याला पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, या बीज प्रक्रियेसाठी टेब्युकोनाझोल ५.४ % w/w एफएस या रासायनिक बुरशीनाशकाची ०.४ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात बुरशीनाशकाची शिफारस केली आहे. • कोरडवाहू गहू पेरणीकरिता एकेडीडब्लू २९९७- १६ (शरद), पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२), एमएसीएस १९६७ आणि एनआय ५४३९. पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू- ३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. • कोरडवाहू रब्बी ज्वारी, करडई, सुर्यफुल आणि हरभरा पिकात डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी. • कपाशीची जातवार स्वच्छ वेचणी करून कोरड्या जागेत कापूस साठवावा.

संक्षिप्त संदेश सल्ला:

• हरभरा पिकामध्ये मर व मुळकुज ह्या बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी टेब्युकोनाझोल ५.४ % w/w एफएस या रासायनिक बुरशीनाशकाची ०.४ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

पिक निहाय सल्ला:

पिक	पिक निहाय सल्ला
हरभरा	• हरभरा पिकाचे पेरणी करिता देशी वाण आणि बियाणे दर- हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे), काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. • हरभरा पिकामध्ये मर व मुळकुज ह्या बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी बियाण्याला पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, या बीज प्रक्रियेसाठी टेब्युकोनाझोल ५.४ % w/w एफएस या रासायनिक बुरशीनाशकाची ०.४ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात बुरशीनाशकाची शिफारस केली आहे.
गहू	• ओलिताखाली गहू पेरणी १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू- ३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. • गहू बियाण्यास पेरणीपूर्वी ॲझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी. • गहू पिकामध्ये बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी गव्हाच्या बियाण्याला बीजप्रक्रिया करावी, यासाठी शिफारस केलेले बुरशीनाशक आणि कीटकनाशके पुढीलप्रमाणे आहेत. बंट (Bunt), ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्बॉक्सिन 75 % डब्ल्यूपी @ 2-2.5 ग्रॅम/किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी डायफेनोकोनाझोल ३ % डब्ल्यूएस @ २ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनाझोल ५.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एफएस @ ०.३ मिली प्रती किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्सिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डब्ल्यूएस @ ३ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा तांबेरा व काणी रोग तसेच वाळवी आणि मावा किडीच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १८.५ % + हेक्साकोनाझोल १.५ % एफएस @ ३ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीज प्रक्रिया करावी. • गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. बागायती उशिरा गहू पेरणीसाठी प्रती हेक्टरी १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. गहू पिकाच्या एचडी २१८९ किंवा पूर्णा यासारख्या जाड दाण्यांच्या वाणांसाठी बियाणे दर प्रती हेक्टरी १२५ किलो वापरावे. बागायती उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. बागायती वेळेवर आणि उशिरा या दोन्ही पेरणीसाठी नत्राची अर्धी मात्रा तसेच संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेली नत्राची अर्धी मात्रा पहिल्या पाण्याचे पाळीच्या वेळी (१८ ते २० दिवसानंतर) द्यावी.
तूर	• तूर पिकावर कळ्या व फुले अवस्थेत हेलीओथीस अळीचा प्रादुर्भाव असल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. तूर पिकास फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत अवस्थेत १ किंवा २ संरक्षित ओलीत करावे.
मोहरी	• मोहरी पिकास पेरणीनंतर २५ ते ३० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. पेरणीपासून २० व ४ दिवसानंतर २ निंदन व डवरणी करून कराव्यात.
ऊस	• सूर्यफूल पिकामध्ये उगवणीनंतर १० ते १५ दिवसांनी विरळणी करावी आणि एका ठिकाणी एकाच जोमदार रोपटे ठेवावे.
कपाशी	• कपाशीच्या पिकावर टार्गेट लीफ स्पॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, मायरोथेसिम पानावरील ठिपके, बाह्य बुरशीजन्य बोंड सड या व्यवस्थापनासाठी रोगप्रतिबंधक फवारणी घेण्याचा सल्ला दिला जातो. प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्राम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्लू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटीराम ५५ % डब्ल्यूजी २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • पांढऱ्या माशीचा पतंग अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास डायफेन्थियुरॉन ५० % डब्ल्यूपी १२ ग्राम प्रती १० लिटर पाणी (६०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा ऍफिडोपायरोपेन ५० g/L २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवा

पिक	पिक निहाय सल्ला
	डायनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा क्लोथीआनिडीन ५० डब्ल्यूडीजी १ मिली प्रती १० लिटर पाणी (५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • कपाशी मध्ये बोंडे लागण्याच्या अवस्थेत गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव व नुकसानीचे निरीक्षण करण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने प्रती झाड एक बोंड या प्रमाणे २० बोंडे तोडून त्याचे निरीक्षण करावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी [१० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या किंवा १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे] (२० बोंडापैकी किमान २ बोंडामध्ये पांढरी किंवा गुलाबी अळी किंवा अळी बाहेर पडण्याचे छिद्र असल्यास) गाठत असल्यास किंवा सतत ३ दिवसामध्ये ८ पतंग प्रती कामगंध सापळ्यामध्ये आढळून आल्यास प्रोफेनोफोस ५० ईसी३० मिली प्रती १० लिटर पाणी (१५०० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमॅमेक्टिन बेंझोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवाइंडोक्साकार्ब १४.५ एससी १० मिली प्रती १० लिटर पाणी (५०० मिली प्रती हेक्टर) किंवा क्लोरपायरीफॉस २० % ईसी २५ मिली प्रती १० लिटर पाणी (१२५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात मिसळून फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी.
भात	• हवामानाचा अंदाज पाहता शेतकऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी परिपक्व झालेल्या धान पिकाची कापणी ही जमीनीलगत करावी जेणेकरुन खोडकिडीची सुप्तावस्था नष्ट होऊन उन्हाळी धान पिकात या किडीचा प्रादुर्भाव कमी होइल. • कापलेला धान पिक २ - ३ दिवस उन्हात वाळू द्यावे व वाळल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीस खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी. • काजळी / काणी / आभासमय काजळीग्रस्त लोंब्या अलगत काढुन खोल खड्ड्यात पुराव्यात किंवा जाळुन नष्ट कराव्यात जेणेकरुन हा रोग इतरत्र पसरणार नाही.

फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

फळे आणि भाजीपाला पिक	फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला
कांदा	• गादीवाफ्यावर कांदा बियाणे हेक्टरी ८ ते १० किलो पेरावे. कांदा लागवडीसाठी पांढऱ्या कांद्याच्या जाती: अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता आणि पुसा व्हाईट राउंड व लाल कांद्याच्या जाती: पुसा रेड, एन २-४-१, निफाड-५३ आणि बसवंत ७८० या वाणाची निवड करावी.
संत्रा	• या महिन्यात (मृग बहार – जुन फुलोरा) नागपुरी संत्रा व मोसंबी च्या झाडांना ठिबक किंवा दुहेरी आळे पद्धतीने ओलीत करावे. संत्रा व मोसंबीच्या एक वर्ष पर्यंतच्या इड्डांना ८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ४ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ३६ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ८ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस आणि १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना १०५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. लिम्बुच्या १ वर्ष वयाच्या झाडांना ४ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस तर १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. आंबिया बहराच्या फळ काढणीस उशीर होत असल्यास १५ दिवसाच्या अंतराने जिबरेलिक आम्ल १५ पीपीएम + १ % युरिया याची दोनदा फवारणी करावी. तन व्यवस्थापन करून बाग स्वच्छ ठेवावी. झाडाच्या बुन्ध्याजावालाची जमीन भुसभुशीत करावी. एक वर्ष वयाच्या झाडांना १०८ ग्राम युरिया आणि ४५ ग्राम म्युरेट ऑफ पोटाश द्यावे. दोन वर्ष वयाच्या झाडांना दुप्पट, तीन वर्ष वयाच्या झाडांना तिप्पट तर चार वर्ष वयाच्या झाडांना चौपट खताची मात्रा द्यावी. खते देतांना नेहमी जमीन हि वाफसा अवस्थेत असल्याची काळजी घ्यावी जेणेकरून पिकास दिलेल्या खताची बचत होईल. बहार असलेल्या फळ बागेतील झाडांना ५०० ग्राम युरिया, ६०० ग्राम सिंगल सुपर फॉस्फेट, १५० ग्राम म्युरेट ऑफ पोटाश, १०० ग्राम फेरस सल्फेट, १०० ग्राम मँगनीज सल्फेट, १०० ग्राम झिंक सल्फेट आणि ५० ग्राम बोराक्स प्रत्येक झाडांना द्यावे. • आंबिया बहार घेण्यासाठी ओलीत थांबवून पाण्याचा ताण द्यावा. फळ काढणीनंतर मृत/जुनाट फांद्या काढून नष्ट कराव्या व त्यानंतर १ टक्के कार्बेन्डाझीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. माव्वा किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी या पैकी एका किटकनाशकाची आलटून पालटून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. कोळी किडीचा प्रादुर्भाव असल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायकोफॉल २ मिली किंवा प्रोपारगाईट १ मिली किंवा इथिओन २ मिली किंवा पाण्यात विरघळणारे गंधक ३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने नमूद किटकनाशक बदलून दुसरी फवारणी करावी. याआधी झाडाच्या बुंध्याला बोर्डेक्स पेस्ट लावली नसल्यास लावावी. चांगल्या प्रतीचे बोर्डेक्स पेस्ट तयार करण्यासाठी एका प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात मिसळून भिजवावे, दुसऱ्या प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो चुना ५ लिटर पाण्यात भिजवून रात्रभर भिजवून ठेवावा. दुसऱ्या दिवशी दोन्ही बादल्यातील मिश्रण

फळे आणि भाजीपाला पिक	फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला
	एकत्र ढवळावे. मिश्रण तयार झाल्यानंतर १२ तासाच्या आत वापरावे. फायटोप्थोरा/डिंक्या ग्रस्त झाडावरील डिंक चाकूच्या सहाय्याने खरडून घ्यावा व मेफेनोक्झाम एमझेड किंवा फॉसीटील एएल आम्लाची पेस्ट लावावी.
वांगे	• वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवा डेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवा स्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवा थियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवा क्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.
मिरची	• तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी ६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी.
टोमॅटो	• टोमॅटो पिकावरील फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी HaNPV 250 LE/ha सोबत 1 % गूळ सनस्क्रीन म्हणून लागवडीनंतर २८, ३५ आणि ४२ दिवसांनी संध्याकाळच्या वेळी फवारणी करावी. किडीचा तीव्र प्रादुर्भाव आढळून आल्यास १० ते १२ दिवसांच्या अंतराने ईमामेक्टिन बेंझोएट ५ एसजी ०.३ ग्राम प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्साकार्ब ०.७५ मिली प्रती लिटर पाणी किंवा फ्लुबेंडियामाइड ०.१ मिली प्रती लिटर पाणी या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. • टोमॅटो पिकावरील टूटा नागअळी (Tuta absoluta) या किडीच्या व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळा आधारित एकात्मिक कीड नियंत्रण अवलंबावे यासाठी ६० Watt चे प्रती एकरी ४ ते ५ इन्कॅन्डेसेंट लाईट बल्ब सापळे बसवावे. • प्रौढांच्या निरीक्षणासाठी प्रती एकर ४ ते ६ तुटा कामगंध सापळे लावावे. • रासायनिक पद्धतीने व्यवस्थापनासाठी इंडोक्साकार्ब १४.५ एससी ०.७५ मिली प्रती लिटर पाणी किंवा स्पिनोसॅड ४५ एससी ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • मिरीड बग, नेसिडिओकोरिस टेनुइस सारख्या नैसर्गिक शत्रूंना प्रोत्साहन द्या.

पशुधन विषयक निहाय सल्ला:

पशुधन विषयक	पशुधन विषयक निहाय सल्ला
गाय	• जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
बकरा किंवा बकरी	• शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी.

इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

इतर (माती / जमीन तयार करणे)	इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला
सामान्य सल्ला	• रोपवाटीकेतील वांगी, टोमाटो, फुलकोबी व पानकोबीचे ४ ते ६ आठवडे वयाची रोपांची शेतात लागवड करावी. मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर याची टप्प्याटप्प्याने लागवड

इतर (माती / जमीन तयार करणे)	इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला
	करावी.